२५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका-२०२२
आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक :- रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.१०/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०५/०७/२०२२

**संदर्भ :- १) मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.१५/१२/२०२१, दि.१९/०१/२०२२, दि.०३/०३/२०२२ व दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेला निर्णय**
**२) राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.४/का.७, दि.९ मे, २०२२**
**३) राज्य निवडणूक आयोगाचा आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२१/ प्र.क्र.१०/का.७, दि.१० मे, २०२२**

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील तरतुदींनुसार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणूका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

२. आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपिल (सी) क्र.१९७५६/२०२१ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४/०५/२०२२ रोजी दिलेला निर्णय दि.४ मे, २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार आयोगाचे संदर्भांकित अ.क्र.३ समोरील दि.१० मे, २०२२ रोजीच्या आदेशान्वये २५ जिल्हा परिषदांमधील देय सदस्य संख्या निश्चित करण्यात आली असून २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. सदर कार्यक्रमानुसार दि.२७ जून, २०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे;

३. आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त नमूद दि.०४ मे, २०२२ रोजीच्या आदेशात नमूद केले आहे की, जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी पूर्ण करीत नाही,

तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवता येणार नाहीत;

४. त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशातील निर्णयानुसार २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या निवडणुकांमधील आरक्षण निश्चित करण्याचा कार्यक्रम देणे आवश्यक आहे. त्याकरिता २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

I. २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांमधील आरक्षित जागांचा तपशिल अनुक्रमे प्रपत्र-१ व २ मध्ये देण्यात आला आहे. जिल्हाधिकारी यांनी परिशिष्ट अ व ब मधील आकडेवारी काळजीपूर्वक तपासून आवश्यक असल्यास त्यामधील योग्य ते फेरबदल, राज्य निवडणूक आयोगाच्या निर्दशनास आणावेत. तसेच सदर आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम सोबतच्या प्रपत्र-३ मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गातील महिला यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

II. राज्य निवडणूक आयोगाने दि.०९/०५/२०२२ रोजी जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या प्रभाग रचना व आरक्षणासंदर्भात आदेश निर्गमित केले आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी आरक्षण सोडत काढण्याकरिता आयोगाचे दि.०९/०५/२०२२ च्या आदेशातील मुद्दा क्र. ६ ते १२ नुसार उचित कार्यवाही करावी.

III. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करण्यासाठी अंतिम प्रभाग रचनेनुसार अनुसूचित जाती / अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येचा उतरता क्रम विचारात घ्यावा. तसेच आयोगाच्या दि.०९/०५/२०२२ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे चक्रानुक्रमाचे पालन करावे.

IV. जिल्हाधिकारी यांनी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांचे आरक्षण निश्चित करण्यासाठी विहित नमुन्यात आरक्षण सोडतीची सूचना प्रसिध्द करावी. आयोगाच्या दि.०९/०५/२०२२ मधील मुद्दा क्र.१२ नुसार आरक्षण सोडतीची कार्यवाही करावी.

V. जिल्हा परिषदेच्या आरक्षणाची सोडत ही जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर पंचायत समितीच्या बाबतीत तालुक्याच्या मुख्यालयी, संबंधित तहसिलदारांकडून आरक्षणाची सोडत काढण्यात यावी. मात्र पंचायत समिती आरक्षण सोडतीवर नियंत्रण ठेवण्याकरिता जिल्हाधिकारी यांनी उपजिल्हाधिकारी पेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करुन त्यांच्या देखरेखीखाली आरक्षित जागा निश्चित करण्याची कार्यवाही करावी.

VI. सोडतीच्यावेळी अंतिम प्रभाग रचनेचा नकाशा व त्यांच्या चतु:सिमा, सोडतीसाठी येणाऱ्या नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावावा.

VII. आयोगाचे दि.०९/०५/२०२२ रोजीच्या आदेशातील परिच्छेद १२.४ नुसार जिल्हाधिकारी यांनी आरक्षणाच्या सोडतीनंतर सोडतीचा निकाल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावा. तसेच हरकती व सूचना मागविण्याकरिता किमान दोन वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रसिध्द करावी.

VIII. जिल्हाधिकारी यांनी आरक्षण, सोडतीचा अहवाल तसेच सोडतीवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना अभिप्रायासह संबंधित राज्य निवडणूक आयोग यांच्याकडे विहित कालावधीत सादर कराव्यात.

IX. राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या निवडणूक विभाग / निर्वाचक गण आरक्षणास जिल्हाधिकारी यांनी सोबतच्या परिशिष्ट-२४(अ) व २४(ब) मधील अधिसूचनेच्या नमुन्यात अंतिमरित्या प्रसिध्दी दयावी.

५. उपरोक्त आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावरील अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सहपत्र - प्रपत्र-१ ते ३

प्रत :-
१) सर्व जिल्हाधिकारी, (मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, धुळे, नंदूरबार, अकोला, वाशिम, नागपूर, भंडारा व गोंदिया वगळून)
२) अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-०१
३) सर्व विभागीय आयुक्त
४) राज्य निवडणूक आयोगाचे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या तिन्ही खंडपीठांमध्ये नेमलेले वकील
५) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
६) निवड नस्ती

(राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२२/प्र.क्र.१०/का.७, दि. ०५/०७/२०२२ सोबतचे सहपत्र)

## प्रपत्र-३

## २५ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत २८४ पंचायत समित्यांचा आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे | टप्पा सुरु करण्याचा / संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षण सोडतीची सूचना परिशिष्ट- मधील नमुन्यात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | ०७/०७/२०२२ |
| २. | अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षित जागा निश्चित करण्याकरिता सोडत काढणे. | | |
| | अ) जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी | जिल्हाधिकारी | १३/०७/२०२२ |
| | ब) पंचायत समिती निर्वाचक गणासाठी | तहसिलदार | |
| ३. | सोडतीनंतर निवडणूक विभाग /निर्वाचक गणनिहाय आरक्षणाची प्रारुप अधिसूचना प्रसिध्द करणे | जिल्हाधिकारी | १५/०७/२०२२ |
| ४. | निवडणूक विभाग /निर्वाचक गणनिहाय आरक्षण निश्चितीबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी | | १५/०७/२०२२ ते २१/०७/२०२२ |
| ५. | आरक्षण, सोडतीचा अहवाल तसेच सोडतीवर प्राप्त झालेल्या हरकती व सूचना अभिप्रायासह राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करणे | जिल्हाधिकारी | २५/०७/२०२२ |
| ६. | प्रारुप आरक्षण अधिसूचनेवर प्राप्त हरकती व सूचनांवरील जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचे आरक्षणास मान्यता देणे. | राज्य निवडणूक आयोग | २९/०७/२०२२ पर्यंत |
| ७. | राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिलेल्या निवडणूक विभाग /निर्वाचक गणाचे अंतिम आरक्षण विहित नमुन्यात शासन राजपत्रात प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०२/०८/२०२२ |

**टिप :- जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील नोडल अधिकारी यांनी प्रत्येक टप्प्यावरील कामकाजाबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.**

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**परिशिष्ट -१६**

जाहीर प्रकटन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १२ उपकलम (१), कलम ५८(१)(अ) प्रमाणे व महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ नुसार अनुक्रमे जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती (स्त्रियांच्या आरक्षणासह) राखून ठेवावयाच्या जागा आणि उर्वरित स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्याकरिता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत काढणे, तसेच आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करुन त्यावर हरकती व सूचना सादर करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम जाहीर करण्यात येत आहे :-

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव / पंचायत समितीचे नाव | सभेची वेळ व तारीख | सभेचे ठिकाण | आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करण्याचा दिनांक | आरक्षणाबाबत जिल्हाधिकारी / संबंधित तहसिलदार यांच्याकडे हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |
| ४. | | | | | |
| ५. | | | | | |
| ६. | | | | | |
| ७. | इत्यादी | | | | |

२. जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहिवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे, त्यांनी वरील ठिकाणी व वेळी हजर राहावे.

जिल्हा:

दिनांक : जिल्हाधिकारी

**परिशिष्ट- २४**

**--------------जिल्हा परिषद /पंचायत समिती**

**प्रारुप / अंतिम आरक्षण**

------------ जिल्हा परिषद / पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक- २०२२ करिता क्रमांक----------------------दि.----------- अन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेमधील निवडणूक विभाग / निर्वाचक गणनिहाय आरक्षण खालीलप्रमाणे राहील :-

**---------- जिल्हा परिषद / पंचायत समितीमधील एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

**----------जिल्हा परिषद निवडणूक विभाग / पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभाग / निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| याप्रमाणे | | | |

ठिकाण :

दिनांक : जिल्हाधिकारी,-----------

## परिशिष्ट-२४ (अ)
## जिल्हा परिषदेतील आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक ---------------------------- ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.१०/का.७, दि.१० मे २०२२ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार --------- जिल्हा परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता ------ निवडणूक विभागांच्या भौगोलिक सिमा क्र.------------, दिनांक-------च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १२(२) अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाने क्र.----------------- दि. ----------- च्या आदेशान्वये ---------- जिल्हा परिषदेतील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र.-------------- दि.---------- च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची अंतिमरित्या प्रसिध्दी करण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार----------- जिल्हा परिषदेतील आरक्षित निवडणूक विभागांची जाहीर सोडत दि.--------- रोजी काढण्यात आली व निवडणूक विभागनिहाय आरक्षण प्रसिध्द करुन त्यावर दि.-----------ते ----------- या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. सदर प्राप्त हरकती व सूचनांवरील अभिप्राय विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-----------, दि.--------अन्वये -------------- जिल्हा परिषदेतील निवडणूक विभागाच्या आरक्षणास मान्यता दिली आहे;

आणि त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र--------------- दि---------- अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी--------------------, जिल्हाधिकारी याद्वारे --------- जिल्हा परिषदेच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या निवडणूक विभागांमध्ये पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे आरक्षण अधिसूचित करीत आहे :-

**------------ जिल्हा परिषदेतील एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

**---------- जिल्हा परिषदेतील निवडणूक विभाग निहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | तालुका | निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| याप्रमाणे | | | |

ठिकाण :

दिनांक : जिल्हाधिकारी,-----------

## परिशिष्ट- २४ (ब)
## पंचायत समिती आरक्षणाबाबतची अधिसूचना

क्रमांक ---------------------------- ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.१०/का.७, दि.१० मे २०२२ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या प्रभाग रचना कार्यक्रमानुसार --------- पंचायत समितीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीकरिता ------ निर्वाचक गणांच्या भौगोलिक सिमा क्र.------------, दिनांक-------च्या अधिसूचनेन्वये शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम ५८(२) अन्वये आणि राज्य निवडणूक आयोगाने क्र.----------------- दि. ----------- च्या आदेशान्वये ---------- पंचायत समितीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांसाठी (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रियांसह) राखून ठेवावयाच्या जागा निश्चित केल्या आहेत;

आणि ज्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने क्र.-------------- दि.---------- च्या आदेशान्वये आरक्षण सोडत काढून त्याची अंतिमरित्या प्रसिध्दी करण्याचे अधिकार संबंधित तहसिलदार यांना प्रदान केले असून सदर आदेशान्वये दिलेल्या कार्यक्रमानुसार----------- पंचायत समितीमधील आरक्षित निर्वाचक गणांची जाहीर सोडत दि.--------- रोजी काढण्यात आली व निवडणूक विभागनिहाय आरक्षण प्रसिध्द करुन त्यावर दि.-----------ते ----------- या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. सदर प्राप्त हरकती व सूचनांवरील अभिप्राय विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-----------, दि.--------अन्वये -------------- पंचायत समितीमधील निर्वाचक गणाच्या आरक्षणास मान्यता दिली आहे;

आणि त्याअर्थी; राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचना क्र--------------- दि---------- अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी--------------------, जिल्हाधिकारी याद्वारे --------- पंचायत समितीच्या संदर्भात शासन राजपत्रात प्रसिध्द केलेल्या निर्वाचक गणांमध्ये पुढील सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे आरक्षण अधिसूचित करीत आहे :-

**---------- पंचायत समितीमधील एकूण जागांचा तपशील**

| अ.क्र. | प्रवर्ग | एकूण जागांची संख्या | पैकी महिलांकरिता आरक्षित जागा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती | | |
| २ | अनुसूचित जमाती | | |
| ३ | सर्वसाधारण | | |
| | एकूण | | |

**----------- पंचायत समितीमधील निर्वाचक गण निहाय आरक्षणाचा तपशील**

| अ.क्र. | तालुका | निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव | आरक्षण |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |
| याप्रमाणे | | | |

ठिकाण :

दिनांक : जिल्हाधिकारी,-----------